
# ममतेचा सुवर्णस्पर्श



(चित्र : स्वरूपा गाडगीळ)

तिला स्वतःच्या हुशारीचा गर्व होता. स्वतःशिवाय कोणावर विश्वास, कोणाबद्दल आपुलकी हे तिला माहीत नव्हते. स्वतःच्या हिंमतीवर ती डॉक्टर झाली होती. डॉ. सीमाला सगळेच वचकून असत. ती कोणाचा कधी कसा अपमान करेल कोणालाही सांगता येत नव्हते. ती आपल्या कामात अतिशय हुशार होती. तिच्या हाताखालील पेशंट्स नक्की बरे होतात अशी तिची ख्याती होती. पण पेशंट्सचे नातेवाईक तिचे आभार मानून तिला प्रेमाने काही भेट देऊ लागले तर ती कधीही स्वीकारत नसे. ती म्हणायची, मी माझे काम करते त्याचा मला पगार मिळतो.

तिने डॉक्टर सदाशिवबरोबर लग्न केले ते त्याच्यावर प्रेम होते म्हणून नाही. त्याच्यावर बऱ्याच जणींचा डोळा होता. पण त्याला ही हुशार बेदरकार मुलगी जास्त आवडली. त्याने हिला प्रपोज केले आणि हिने इतरांना शह देण्यासाठी होय म्हटले.

माणसाचा स्वभाव, तो कसा वाढला, बालपण कसे गेले यावरही अवलंबून असतो. ती घरातली मोठी मुलगी. तब्येतीने सणसणीत, अभ्यासात हुशार, वाचनाची आवड, शाळेत कायम पहिला नंबर. पण ती रंगाने सावळी. धाकटी बहीण नाजूक, दिसायला सुंदर व तिच्या पाठीवर झालेला भाऊ यांचेच तिच्या आई—वडिलांना कौतुक. हिचे अभ्यासातले यश त्यांना निरुपयोगी वाटायचे. ती सतत पुस्तके वाचते

व फिरायला, सिनेमाला येत नाही म्हणून तिला सगळे मूर्ख म्हणायचे. ते तिला कॉलेजमधे पाठवायला तयार नव्हते. तिला स्कॉलरशिप मिळाली म्हणून ती कॉलेजात गेली. नंतर तिने भरपूर कष्ट करून आपले शिक्षण चालू ठेवले. सुट्टीत मिळेल तो जॉब करुन पैसे साठवून मेडिकलला गेली. मग ती हॉस्टेल मधे राहू लागली. घरचा संबंध जवळ जवळ तुटला.

डॉक्टर झाल्यावर तिने पहिल्या पगारात आई—वडिलांना, भावंडांना चांगले कपडे, भेटवस्तू दिल्या. पण नंतर त्यांच्या पैशाच्या मागण्या वाढू लागल्या. तिला समजले त्यांना तिचे प्रेम नाही तर तिच्या पैशावर त्यांचा डोळा आहे. तेव्हापासून तिने अलिप्तपणा पत्करला.

सदाशिव अतिशय सुस्वभावी व ही तुसडी अशीच त्यांची ख्याती होती. लग्न झाल्यावर तिने माहेर किवा सासरच्या लोकांशी कसलेच संबंध ठेवले नाहीत. आपल्या प्रेमासाठी किंवा आपलं कौतुक म्हणून ही माणसे आपल्याशी संबंध ठेवायला बघत नाहीत तर आपल्या पैशावर यांचा डोळा असतो असे तिचे ठाम मत होते. त्याचा तिला राग होता. तेव्हा घरात ती दोघेजणच असत. ती कामावर जाण्यापूर्वी मोलकरणी येऊन काम करून जात. दोघेही डॉक्टर असल्याने सबंध दिवस कामात जाई. हॉस्पिटल व घर असे त्यांचे आयुष्य झाले होते.

तशात हा कोरोना आला. दोघांचे काम भरपूर वाढले. दिवस दिवस हॉस्पिटलमधेच रहावे लागे. घरात कामालाही कोणी नाही. घरी येऊन एकमेकांच्या मदतीने साफसफाई, जेवणखाण करावे लागे. दिवस भरभर जात होते. आणि एक दिवस सीमा घरी आली ती दमून झोपून गेली. संध्याकाळसाठी जेवण करायचे होते पण उठणे अशक्यच झाले. सदाशिव पण ड्युटीवर. काय करावे समजेना. तशीच झोपून राहीली. रात्री उशिरा सदाशिव घरी आला. बघतो तर ही झोपलेली. तो आधी बाथरूम मधे जाऊन आंघोळ करून साफ होऊन आला व तिला उठवू लागला. ती नुसती कण्हत होती. त्याने हात लाऊन पाहिले तर अंग खूप गरम लागले. त्याने थर्मामीटर लावून ताप बघितला. बराच होता. औषध द्यायला हवे. पण सकाळपासून काही खाल्लेलं नाही हे त्याच्या लक्षात आले. तेव्हा किचनमध्ये जाऊन कुकर लाऊन त्याने मऊ भात केला. तिला बळेच उठवून भरवला. तिला किंचित बरे वाटले. मग तिला औषध देऊन झोपवले. पण अशा स्थितीत तिला सोडून उद्या कामाला कसे जाणे शक्य होणार? तो विचारात पडला. हॉस्पिटलमधे रोगी जास्त व स्टाफ कमी अशी स्थिती या कोरोनामुळे झाली होती.

ती झोपली हे बघून तो बाजूला आरामखुर्चीत रेलला. एव्हढ्यात त्याच्या आईचा फोन आला. ती नेहमी त्या दोघांची चौकशी करायची. आता तर कोरोनामुळे त्या दोघांना खूप काम पडते हे तिला कळत होते. काळजीही वाटायची. तेव्हा रोज रात्री ती त्याला फोन करायची. कित्येकदा त्याला रात्री पण थांबावे लागे. तिचा फोन आला की सीमा नेहमी म्हणायची, “आला आईचा बाळाला फोन, ती तुला अजून बाळच समजते काय रे?” असे कुत्सितपणे विचारायची पण तो तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करायचा. असो. त्याने आईचा फोन घेतला. तिला म्हणाला, “सीमाला खूप ताप आलाय. मी तुला उद्या फोन करतो. आता फार दमलोय.”

दुसऱ्या दिवशी सीमा उठली. तिला चक्कर येत होती. तशीच उठून ती तोंड धुवायला बेसिनकडे गेली आणि तिला भडभडून ओकारी झाली. यापूर्वी तिला असे कधीच झाले नव्हते. ती गडबडली. ती परत गादीवर जाऊन झोपली. सकाळी उठल्यावर सदाशिवने ताप बघितला. ताप पूर्णपणे उतरला होता. अतिश्रमाचा ताप होता वाटते. त्याने आईला फोन करून सर्व सांगितले. ती म्हणाली, "सीमाची काळजी घे." सदाशिवने एक दिवस रजा घेतली कारण नाईलाज होता. सीमाबाबत पण हॉस्पिटलमधे कळवले. सीमाची कोरोना टेस्ट करायला हॉस्पिटलची नर्स आली. हिच्यात तशी लक्षणे नव्हती, तरीही टेस्ट करणे जरुरी होते कारण ती सतत हॉस्पिटल मध्ये काम करत होती. चार दिवसांनी रिपोर्ट निगेटिव्ह आला, पण हिला काही खायला होतच नव्हते. खाल्ले की ओकारी व्हायची.

ह्या कोरोनाच्या गडबडीत तिचे स्वतःकडे लक्षच नव्हते. घरचे व हॉस्पिटलचे काम करता करता त्यांच्या प्लॅनिंगकडे पूर्ण दुर्लक्षच झाले होते. हिची पाळी दोन महिने आलीच नाही हे तिच्या आता लक्षात आले. अरे बापरे, अशावेळी मी यात अडकले तर ड्युटी कशी करणार असा विचार तिच्या मनात आला. तसे तिने सदाशिवला म्हटले. सदाशिव म्हणाला "थोड्या दिवसांनी ओकाऱ्या थांबल्या की तुला बरे वाटेल. तो पर्यंत लॉकडाऊन पण जाईल." "पण मला उठायलाही होत नाही. तू तर एकदा सकाळी गेलास की रात्री येशीलच अशी खात्री नाही. मी एकटी कसे करणार? स्वतःला कसे सांभाळणार?" ती एकदम हळवी झाली. प्रथमच आयुष्यात तिला आपण कोणाला जवळ केले नाही याची जाणीव झाली.

पण ती तरी काय करणार! तिच्या सख्ख्या आईबापांनी तिला आपलेपणा दिला नाही. कधी कौतुक नाही. टोचणे व ओरबाडणेच तिच्या वाट्याला आले. त्यामुळे अलिप्तपणाच तिचा स्थायीभाव झाला. तरीही आता ती आई होणार होती. हे आपल्या आईला कळवावे असे तिला वाटले. ते जवळच्याच गावी रहात होते. तिने घरी फोन लावला. वडिलांनी फोन घेतला. तिने त्यांना तुम्ही आजोबा होणार असे सांगून आपली परिस्थिती सांगितली. आई आली तर मला धीर येईल, आधार वाटेल असेही म्हणाली. पण बाबा आणि भावाने लॉकडाऊनचे कारण सांगून तिथे कोणाला येणे शक्य नाही असे सांगितले. "एव्हढ्या दिवसात कधी फोन नाही, कधी विचारणा नाही, बोलावणे नाही. आता गरज पडली तेव्हा बोलावतेय. भयंकर अप्पलपोटी, स्वार्थी, घमेंडी आहे." मागून बहीण बोलत होती व आई तिला दुजोरा देत होती.

तिला वाटले, मी कोणाशी कधी वाईट वागले नाही. यांनी मला कधी जवळ केले नाही. स्वार्थ यांनीच दाखवला. बाहेरच्या जगात एकटीने पुढे जाऊन आपले ध्येय गाठायचे असेल तर थोडे स्वार्थी, स्वाभिमानी असावेच लागते. तिला खूप वाईट वाटले. हे माझे रक्ताचे नातेवाईक ना? मी यांना कधी त्रास दिला नाही. डॉक्टर होईपर्यंत मी रेसच्या घोड्यासारखी धावत होते. कोणाकडे हात पसरला नाही. मोकळी झाल्यावर त्यांना माझ्या आनंदात सहभागी करण्याचा प्रयत्न केला तर त्यांनी माझे एटीएम् मशिन करण्याचा प्रयत्न केला. आणि आता मलाच स्वार्थी म्हणताहेत. यांच्या अशा वागण्याने माझा नातेसंबंध, मैत्री यांवरचा विश्वासच उडाला. त्यामुळे मी माणसे जोडलीच नाहीत. सदाशिवचा

स्वभाव चांगला. तो मला सांभाळून घेतो पण त्याच्या आई–वडिलांशी पण मी घाबरून नाते जोडले नाही. मी केले ते योग्य की अयोग्य हेच मला कळत नाही. उद्या माझ्या मुलाला आजी, आजोबा, मावशी, मामा कोण मिळणार? माझे बाळंतपण कसे होणार? कोरोनामुळे, पैसे देऊनही कोणी काम करायला येणार नाही. विचार करून डोके गरगरू लागले. तिला ग्लानी आली. तिचे डोळे मिटले गेले ते तिला समजले नाही.

कधीतरी तिला जाग आली तर तिच्या मस्तकावरून कोणाचा तरी हात प्रेमळपणे फिरतो आहे असे वाटले. सदाशिव आला की काय कामावरून अशा विचारात तिने डोळे उघडले तर सदाशिवची आई तिच्या केसांवरून मायेने हात फिरवीत म्हणाली, "कसे वाटते आहे बाळा? खूप त्रास होतो आहे का? सदाशिवचा फोन आला आणि मला रहावेना. तो कामावर गेला. कधी येईल ते माहीत नाही. तू एकटी अशा अवस्थेत कशी सांभाळशील स्वतःला म्हणून सरळ निघून आले. वाटेत पोलिसांनी अडवलं, त्यांना सांगितलं की मी डॉ. सदाशिवची आई आहे. त्याच्या घरी जातेय. ते डॉक्टर सदाशिवला ओळखत होते. टी.व्ही. वर पण तुमचे हॉस्पिटल दाखवले होते. तुमची मुलाखत पण झाली होती ना. डॉ.च्या घरी जाते म्हटल्याबरोबर ते माझ्या बरोबर इथपर्यंत आले. तुमच्या घराची एक चावी सदाशिवने आमच्या घरी इमर्जन्सी म्हणून ठेवली होती. ती घेऊन मी आले. घरात आले तर तू निपचित पडली होतीस. क्षणभर काय करावे ते सुचेना. बाथरूममधे हातपाय धुवायला गेले तिथे पॅरॅशूट तेलाची बाटली दिसली. तेलाने पावले चोळली, हाताला, बोटांना मालिश केले. कपाळावर गार पाण्याची पट्टी ठेवली, जे सुचलं ते केलं मग डोक्यावर हळू हळू हात फिरवत देवाचं नामस्मरण करीत बसले. एक तास होऊन गेला. आता तू डोळे उघडते आहेस. अग बाळा एव्हढे बरे नाही तर लगेच मला बोलवायचे नाहीस का? तुमच्या शिवाय आमचे या जगात कोण आहे? तुमच्या सुखासाठीच आम्ही देवाची प्रार्थना करीत असतो." त्यांनी तिला थोडेसे पाणी प्यायला दिले व म्हणाल्या, "इथे नीट पोचले की नाही याची हे घरी काळजी करीत असतील. त्यांना आधी फोन करते. तू पण बरी आहेस असे सांगते. तेही घरी तुझ्या काळजीत असतील. आणि तुझ्या तोंडाला चव येईल असे आंब्याचे व लिंबाचे लोणचे आणले आहे. मऊ भात करून आणलाय तो गरम करुन देते. तू आई होणार आहेस. तुला स्वतःची आणि बाळाची पण काळजी घ्यायला हवी ना."

सासुबाईंच्या या दर्शनाने सीमा हळवी झाली. एव्हढ्या मायेने आयुष्यात तिच्याशी कोणी बोलले नव्हते. घरच्यांच्या कुजक्या, तुसड्या वागण्याने तिचा स्वभाव कोरडा आणि अलिप्त झाला होता. ती आपले सर्व लक्ष कामात झोकून देई. लोकांशी संबंध वाढवणे, गोड वागणे, बोलणे ह्याकडे तिने कधी लक्षच दिले नाही. इतरांचे सोडा, पण सदाशिवच्या आई–बाबांशी देखील तिने संबंध ठेवले नव्हते.

खरेतर सदाशिव एकुलता एक मुलगा. त्याला आपले आई–वडील आपल्याकडेच असावेत असे वाटत होते. पण एव्हढे मोठे घर असताना देखील तिला सासू–सासरे घरात नको होते. हिच्या कडक ठाम वागण्यामुळे तिच्यापुढे सदाशिवचे काही चालले नाही. आपण आपल्या आई–बाबांना आपल्या घरी आणू शकत नाही याचे त्याला खूप वाईट वाटले. पण त्याच्या आई–वडिलांनीच त्याला समजुतीने सांगितले की तुझे आयुष्य तिच्याबरोबर बांधले आहे. आमची काळजी करू नकोस. आम्हाला इथली

सवय आहे. शेजारी मित्रमंडळ, बाजारहाट सर्व सवयीचं आहे. आणि तू पण जवळच आहेस. कुठे लांबच्या गावी किवा इंग्लंड अमेरिकेला नाहीस. रोज फोनवर खुशाली कळते. अडचणीला आहेसच जवळ. उगीच मन हिरमुसले करू नकोस. एकमेकांना सांभाळून सुखाने संसार करा.

सीमाचे मन भरून आले. त्यांच्या मांडीवर तोंड घाशीत ती म्हणाली, "आई मी चुकले. तुमच्या मनाच्या चांगुलपणाची, मायेची जाणीव माझ्या रुक्ष मनाला उमजलीच नाही. मी फार विचित्र परिस्थितीत वाढले. तिथे प्रेम, आपुलकी या गोष्टी माझ्यासाठी दुर्मीळ, अप्राप्य होत्या. आता तुमच्या रुपाने मला हवे ते आईचे प्रेम माझ्या पुढ्यात आलेय. ते मी हरवू देणार नाही. आता तुम्ही कायम इथेच रहायचे. सदाशिव आला की त्याला सांगूया बाबांना इथेच घेऊन यायला." आयुष्यात प्रथमच तिला मायेची जाण झाली होती. तिच्या आयुष्याला आता सोनेरी किनार लागणार होती. तिच्या जीवनाचा तो सुवर्ण क्षण होता. उशीवर डोके ठेऊन मिटल्या डोळ्यांनी तो आनंद हृदयात साठवत शांतपणे पडून राहिली.

**नलिनी करंडे**
nalinikarande5@gmail.com